# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७२१-२६६८०६८ Email: directornss@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/रासेयो/१७/७६४/२०२४
दिनांक : १२.०२.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व रासेयो महाविद्यालये,**
**संलग्नित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,**
**अमरावती**

**विषय :- राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत जिल्हा समन्वयक नेमणुकीसाठी अर्ज पाठविण्याबाबत...**

**मा.महोदय/महोदया,**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सुमारे २६५०० हुन अधिक रासेयो स्वयंसेवक आणि २०० हुन अधिक रासेयो कार्यक्रम अधिकारी या विभागाच्या माध्यमातून आपआपल्या महाविद्यालय/दत्तकग्राम पातळीवर सामाजीक कार्यात्मक योगदान देत आहे. विद्यापीठाच्या वाटचालीत व प्रभावशाली मानांकनात महत्वाची भर घालत आहे. हि वाटचाल अधिक गतीमान करणे ही रासेयो विभागाची व आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

महाविद्यालयीन पातळीवरील नियमित कार्यक्रम, विशेष श्रमसंस्कार शिबिर आणि विविध परिपत्रके शिवाय राज्य व राष्ट्रीय पातळींवरील ध्येयधोरणांना अनुसरुन जे कार्यरत आपल्याकडे सुपूर्द केले जातील त्याची कठोर अंमलबजावणी, त्यांचे नियोजन व अंकेक्षण अतिशय महत्वाचे आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रासेयो संलग्नीत महाविद्यालयामध्ये रासेयो विद्यार्थ्यासाठी विविध सांस्कृतीक व सामाजिक उपक्रम महाविद्यालयस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, विद्यापीठस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तरावर राबविले जातात. तसेच आव्हान, उत्कर्ष, हिवाळी शिबिर, राष्ट्रीय एकता शिबिर, राष्ट्रीय व राज्य स्तरीय पथसंचलन, राष्ट्रीय व राज्य साहसी शिबिर, यासारखी शिबिर आयोजीत केली जातात. या शिबिरांचे आयोजन तसेच या शिबिरांसाठी विद्यार्थ्यांचा सराव करुन घेणे आणि वेळोवेळी शिबिरासोबत संघनायकाची निवड व विद्यार्थ्यांची निवड करण्याची जबाबदारी सर्व जिल्हा समन्वयक पार पाडत असतात. तसेच विद्यार्थी आणि विद्यापीठ यांच्यातील दुवा म्हणून ते काम करीत असतात.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या पाच जिल्हयामध्ये रासेयोचे अधिक मजबूत संरचन करण्यासाठी रासेयो विभागाकडून ०६ जिल्हा समन्वयक यांचे मा. कुलगुरु यांच्याकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालयातील जिल्हा समन्वयक पदाकरीता इच्छूक राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांची व योजनांची माहिती असणाऱ्या शिक्षकांची विस्तृत माहिती (बायोडाटा) कार्यात्मक सारांक्षासह व मार्गदर्शक तत्वामधील पात्रतेच्या पुराव्यासह आपल्यामार्फत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे सोमवार दि. २६/०२/२०२४ पर्यंत आपल्या शिफारसीसह पाठविण्यात यावी. हि विनंती.**

**सहपत्र :-१.**

आपला

(डॉ. निलेश कडू)
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी :**

मा. कुलगुरु/अध्यक्ष राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
मा. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

# जिल्हा समन्वयक नेमण्यासाठी मार्गदर्शक तत्वे

**पात्रता :-**

१) राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून कमीत कमी तीन वर्षे काम केलेले असावे.
२) रासेयो अंतर्गत कमीत कमी तीन विशेष शिबिरांचे आयोजन केलेले असावे.
३) संबंधित विद्यापीठांच्या अधिनस्त महाविद्यालयात कायमस्वरूपी अधिव्याख्याता पदावर कार्यरत असावे.
४) त्यांचा जनसंपर्क चांगला व मोठया प्रमाणात असावा.
५) त्यांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.
६) रासेयो उद्‌बोधन वर्ग प्रशिक्षण (अहमदनगर येथील ETI Training) पुर्ण केले असावे.